# मला उद्ध्वस्त व्हायचंय्

मलिका अमर शेख

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**मला उद्ध्वस्त व्हायचंय्**
मलिका अमर शेख

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
मलिका अमर शेख

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ १६०/-

**जेनी मार्क्स –**

मार्क्सवादाइतकीच अटळ, सुंदर न्

उंच वाटलीस मला !

तुला अर्पण.

**– मलिका**

# प्रास्ताविक

स्वत:च्या आयुष्याला सामोरं जाणं यापेक्षा चारचौघांसमक्ष त्याचं निखळ नग्न रूप पाहणं जास्त कठीण आणि दाहक असतं. आत्मचरित्र आजवर कित्येकांनी लिहिलंय्... प्रसिद्ध पावलेल्या यशस्वी, कर्तबगार पुरुषांची चरित्रं... पण आत्मचरित्र लिहिलं, म्हणजे खरंच माणूस मांडून होतो का? आयुष्याला सर्वस्वी मांडणं हे ते भोगण्याहून कठीण वाटावं... न् तरीही कुठलीही महत्त्वाची व्यक्ती नसलेली मी केवळ स्त्री म्हणून माझ्या आयुष्याच्या सगळ्या खिडक्या-दारं उघडायचं ठरवलं, हे एक मूर्ख धाडस म्हणा किंवा काही म्हणा... शेवटी लिहिणं-सांगणं... या गोष्टी काही वेळा इतक्या अपरिहार्य अटळपणे घडत जात असतात, की समोर प्रेक्षक-वाचकवर्ग असला काय, नसला काय, त्या आपल्या बोलत असतात.

मला एक स्त्री म्हणून या पुरुषप्रधान संस्कृतीकडे न्याय मागायचाय्. माझ्यापुढे माझी भूमिका स्पष्ट आहे.

माझ्या व्यक्तिगत आयुष्याची चामडी सोलून काढली पूर्णत: न् काही जण त्याला वातड म्हणाले, तरीही हरकत नाही. एक वेगळं अनुभवविश्व जगलेलं माझं आयुष्य या घडीला समोर येणं आवश्यक वाटतं मला- माझ्या दृष्टीनं, इथल्या साऱ्या कुंठित झालेल्या साऱ्या स्त्रियांच्या दृष्टीनं...

बाई जोपर्यंत लज्जा, संकोच न् त्यागाची सहनशील वस्त्रं उतरवत नाही, तोवर तिचं भोगणं, तिचं दु:ख हे दुर्लक्षित किंवा गृहीत धरलं जातं... न् स्त्रीचं दु:ख गृहीत धरलं जाणं हे ज्या समाजाला मान्य असतं, तो समाज तिला कौतुक, सहानुभूती किंवा वाटोळं या तीन गोष्टींशिवाय दुसरं काहीही देऊ शकत नाही. समाजाला ते बळी जाणं अंगवळणी पडतं; सवयीचं होतं.

कितीतरी माणसं भेटली मला. खवल्याखवल्यांच्या आयुष्याची... जखमी... काही उंच, काही ठेंगू... माणसांना वापरण्याची कला ज्यांना उत्तम रीतीनं

जमलीय्, अशी... काही अशी, काही तशी... पण या सगळ्यांनीच मला काही ना काही दिलं... समृद्ध केलं... सरतेशेवटी तुमचं माणूसपण या अनुभवांतूनच घडत जातं; पण त्याला अर्थ आपणच द्यायचा असतो. सरतेशेवटच्या क्षणी अवघं आयुष्य समोर उभं राहून नजरेला नजर भिडवेल, त्या क्षणी आपण त्याला तेवढ्याच ताठ नजरेनं उत्तर देऊ शकू ना?

–प्रेम म्हणजे काय असतं खरोखर?
एक मोठा बोगदा... थोडीशी पोकळी
ज्याच्या एक तोंडाशी आपण असतो
दुसऱ्या तोंडाला थेंबभर प्रकाश
न् मध्ये गोठून गेलेला लांबच लांब काळोख...

प्रेम सांधणारा या रस्त्यानंच गेला का, हो?
कसा दिसतो तो?
आणि सांधलेलं प्रेम न सांधल्यासारखं एकसंध दिसतं का, हो?

प्रेम हा कुठला अस्वली चेहरा
मला गुदगुल्या करून मारतोय् क्षणोक्षणी?
प्रेम... एक अबलख घोडा
जो फक्त स्वप्नात येतो परिपूर्ण
न् सत्यात कधी त्याची फक्त आयाळ
कधी फक्त शेपूट
कधी उधळलेले खूर चौखूर...
कधी पाणावलेले डोळे
तर कधी नुसतंच त्याचं अश्वमेधी हास्य...

प्रेम–एक चामडीचा आरसा...
ज्यात आपलं प्रतिबिंब– निव्वळ भेसूर, बीभत्स किंवा कधी खरं...
प्रेम केव्हा केव्हा एक भाकरीचा तुकडा
प्रेम केव्हा एक कोरा कॅनव्हास
प्रेम... शरीरातून निघालेला रक्ताचा थेंब

जो बाहेर पडल्यावर आपला नसतो
संपूर्ण संघर्षानंतर आलेलं शहाणपण
किंवा निष्कर्ष जय-पराजयाचा
यातनं काय साधतं?
एखादा अशोक,
एखादा नेपोलियन बोनापार्ट
ज्यांनी स्वत:वर निहायत प्रेम केलं
किंवा ज्यांना फक्त प्रेमच करता येतं,
अशांचं बेमिसाल बळी जाणं...

प्रेम ही फक्त अनावर भावना?
अनुभूती?
समाधिस्थ आत्म्याची गुणगुण,
की रक्तातनं जन्माला आलेलं गोजिरवाणं फुलपाखरू
-जे आपण कधीच धरू शकत नाही?

एका वेळी बागडणारं मन
कठोर होऊन जातं दु:खानं
त्याचं मूळ प्रेमच असतं ना?
एका वेळी वैतागलेलं आयुष्य
दचकून थबकतं मृत्युभयानं
ते काय असतं?
फक्त आयुष्याबद्दलच्या अवघ्या प्रेमाची व्याकुळता, की आणि काही?
की प्रेम एक लहानसं निरांजन असतं?
जे देहाच्या वातीनंही लागू शकत नाही
न् लागलंच, तर जाळून काढतं तेजानं सारं आयुष्य...
न् तरीही प्रेमाबद्दलच प्रेम वाटावं,
इतकं प्रेम येतं कुठून?
मला माहीत नाही... मला माहीत नाही...

**- मलिका अमर शेख**

...तर माझ्या आयुष्याला जिथून सुरुवात झाली,
ते एक भावरम्य स्वप्न
तिथलं ऊनही कोवळं हळवं...

एक चिमुकलं घरटं–
जिथं प्रत्येक दिवस फुलपाखरासारखा रंगीबेरंगी... नाजूक पंखांचा...
त्या घरातल्या हिरव्यागार भिंती सळसळून उडणाऱ्या गवतरानासारख्या...
सतत किलबिलत लडिवाळपणे वाऱ्याला आंजारत गोंजारत राहायच्या...
त्या उबदार, सुखद आठवणी लहान मुलाच्या मऊशार रेशमी जावळासारख्या भुरभुरत...
खूप दिवसांनी आईच्या मांडीत डोकं घुसळून निजलेल्या लहानग्या बाळासारख्या...

मला कळायला लागल्यापासून...
कोडकौतुकानं ओथंबणारे डोळे...
चांदीसारख्या शुभ्र तेजाळत्या रात्री
साक्षात उडत्या घोड्यावरचा राजपुत्र इवान...
कोंबडीच्या पायावर फिरत्या झोपडीतली बाबायागा चेटकीण...
पऱ्यांचा घोळदार झळाळता तांडा, अरेबियन नाइट्सच्या रात्री फेर धरून नाचत...
सिंदबाद... अलीबाबा... जादूचा हंडा... उडता घोडा...
कितीतरी गोष्टी...
कौतुकाचा झोपाळा... फुलांनी सजवलेला... मोठा... लोखंडी कड्यांचा...
त्यावर वाघाचं चामडं आणि लोड हातात, मांडीवर ठेवून मी पाय हलवतेय्...
झोपाळा मागंपुढं होतोय्...
घर माझ्याबरोबर झोके घेतंय्...
बालपण...
झोके मोठे मोठे होतात...

१

भाई बार्शीचे. मुसलमान कुटुंबात जन्माला आलेले. आईचं नाव मुनेरबी. भाईंच्या वडिलांनी त्यांना सोडलेलं. शेतातली कामंधामं करून, इतर आयांसारखंच कष्ट-दु:खं सोसून तिनं मुलांना वाढवलं. तिच्या ओव्या ऐकता ऐकता भाई मोठे झाले. क्लीनर म्हणून नोकरीला लागले. बार्शीच्या कामगार-चळवळीत राष्ट्रीय बाण्याचे पुरोगामी युवक म्हणून भाईंनी लाल बावटा ट्रेड युनियन संघटनेत प्रवेश केला होता. आवाज चांगला असल्यामुळं तयारी चालली होती. रानात जाऊन, मोकळ्या हवेत जाऊन वरच्या पट्टीत गाणं... हाच रियाज... गिरणीत नोकरी लागलेली; पण मंदीचा तडाखा बसून थोड्याच महिन्यांत सुटलीही. मग संपाच्या कटकटी, त्यात पुढाकार आणि विसापूर जेलची यात्रा. तिथं गुरू भेटले कॉ. कऱ्हाडकर. त्यांच्याकडून कम्युनिझमचा मंत्र मिळाला आणि भाईंच्या जीवनाला अनपेक्षित विलक्षण गतीनं कलाटणी मिळाली. पुढं सुटल्यावर कम्युनिस्ट पार्टीचं काम मोठ्या धडाक्यात सुरू झालं... जोडीला पहाडी, तळपत्या सुरांची सोबत. पुढं कम्युनिस्ट पार्टीवर बॅन आला. पोलिसांचा ससेमिरा चुकवून भाई कोल्हापूरला आले. तिथं मास्टर विनायकांच्या स्टुडिओत नोकरीला लागले. तिकडेही कॉम्रेड लोकांचा ग्रीप होता. आता 'मेहबूब पटेल'चं 'अमर शेख' या तिथल्या लोकांनी दिलेल्या नावात रूपांतर झालं; पण सिनेमासृष्टी त्यांना मानवली नाही.

नंतर आई-भाईंचं प्रेमप्रकरण म्हणजे गाजलेली फॅण्टॅस्टिक प्रेमकहाणी ! दोघंही कम्युनिस्ट पार्टीचे कार्यकर्ते... एका सभेच्या ठिकाणी ओळख झाली... ओळख वाढली.

आमची आई टिपिकल पाठारे प्रभू. घरी दोन बहिणी, दोन भाऊ. आईचं नाव कुसुम जयकर. त्या काळात इंटरकास्ट लव्हमॅरेज ही फारच खळबळजनक,

चित्तथरारक वगैरे गोष्ट होती. ज्या वेळी दोघांनी लग्न करायचं ठरवलं, तेव्हा सर्वांत हलकल्लोळ उडणार होता, तो आईच्याच घरात.

पण त्या आधीच पार्टीनं दोघांच्या लग्नाला विरोध केला ! झालं ! दोघेही हादरले. कारण पार्टीची शिस्त कडक होती आणि दोघांची पार्टीवर श्रद्धा. आई ही मध्यमवर्गीय, सुशिक्षित. ग्रॅज्युएट. पुन्हा म्युनिसिपालिटीमध्ये नोकरी आणि भाई हे फक्त फायनल झालेले कामगार... तेव्हा या दोघांचं पटणार नाही आणि पार्टीच्या कामात अडथळा येईल– तेव्हा हे लग्न होऊ नये, असा 'पार्टी मॅन्डेट' देण्यात आला.

आईच्या जातवाल्यांपैकी एक अनोळखी सधन गृहस्थ आईच्या ऑफिसमध्ये जाऊन भेटले, ते आईला दत्तक घ्यायला तयार झाले. पैसेही देऊ केले... कारण आईनं मुसलमानाशी लग्न करू नये !

अखेर रजनी पटेल वगैरेंनी मध्यस्थी केली. मग काय? पार्टीची परवानगी मिळाल्यावर घरच्यांच्या विरोधाला कोण बघतंय्? प्रेमपरंपरेनुसार मिळालेल्या धाडसानं आई घरातनं जवळजवळ पळूनच आली. कारण आई-वडिलांनी तिला चिठ्ठी लिहून बजावलं होतं :

''आम्हाला विष दे आणि आमच्या प्रेतांना ओलांडून मगच लग्न कर !''

पण आई कुणाला विषबिष देण्याच्या भानगडीत पडली नाही.

मागच्या पिढीतले लोकच खमके.

तर तमाम अडचणी ओलांडून, विरोधांचा नाना प्रकारचा सुकामेवा पचवून आई-भाईंनी अवघ्या पाच रुपयांत लग्न केलं ! आई सांगत होती,

''त्या रजिस्ट्रारचा चेहरासुद्धा एरंडेल प्याल्यासारखा झाला होता !''

लग्नानंतरची आर्थिक स्थिती वाईटच होती. पहिली दीदी... म्हणजे प्रेरणा. नंतर झालेली दोन मुलं सातमाशी गेली. अपुरं जेवण, धावपळ, दगदग... पिकेटिंगच्या वेळी केलेले जिन्यावरले चढउतार... भाई तुरुंगात... दीदीच्या दुधालाच पैसे पुरायचे नाहीत. तेव्हा घरकामाला एक गडी होता. पैसे नसताना नोकराचं कसं भागणार? आईनं त्याला गावी जायला सांगितलं; पण तो जाईना. म्हणाला,

''मला नको पैसे. तुम्ही खाल त्या भाकरीतला तुकडा द्या, बस्स !... मालक तुरुंगात... तुमी हपीसला जानार. बेबीकड कोण बघेल?''

त्या खडतर, खडकाळ आयुष्यात असले माणुसकीचे निर्मळ खळाळही वाट्याला येत होते.